ASHWINI PUBLICITY
INFINITE IDEAS BEHOLD

| PUBLICATION | Navrashtra (Mumbai Plus) | DATE | 29th July 2019 |
| --- | --- | --- | --- |
| EDITION | Mumbai | PAGE NO. | 03 |

नव राष्ट्र

# महिलांसाठी 'हर-हायनेस्ट' घरे प्रकल्प

## या प्रकल्पातून पुढच्या १० वर्षांत १००० महिलांना घर देण्याची शाश्वती !

**मुंबई :** महिला सक्षामिकरणाच्या दिशेने केवळ विचार न मांडता त्याला आपल्या अनुभवाच्या आधारे त्रिमित रचना 'हर हायनेस्ट' या फक्त स्त्रियांसाठी असलेल्या गृहप्रकल्पाचे उद्घाटन सोहळा १९ जुलै २०१९ रोजी वीर सावरकर सभागृह, शिवाजी पार्क येथे ३५० महिलांच्या उपस्थितीत झाला. या कार्यक्रमात भारतीय चित्रपट निर्मात्या अश्विनी सिधवानी, त्रिमित रचनाच्या सर्वेसर्वा प्रज्ञा पोंक्षे, प्रसिद्ध अभिनेत्री मृणाल कुलकर्णी तसेच माईक ग्लोवर (सल्लागार - त्रिमित रचना) प्रकाश राव (श्री स्वामी समर्थ डेवलपर्स) मान्यवर उपस्थित होते. या योजनेचे नेमके स्वरूप स्पष्ट करताना त्रिमित रचनेच्या सर्वेसर्वा प्रज्ञा पोंक्षे, म्हणाल्या, 'हर हायनेस्ट' ही संकल्पना फक्त स्त्रियांसाठी आखली आहे.



यासाठी "हर हायनेस्ट" ही संकल्पना मांडली आहे.स्त्री आणि पुरुष हे एकमेकांना समान मानण आणि ते कागदोपत्रीही असण गरजेचे आहे. तसेच स्त्रीचा आत्मप्रतिष्ठा हा सगळ्यात महत्वाचा मुद्दा आहे. हीच बाब लक्षात घेऊन ही खूपचे सुंदर कल्पना प्रत्यक्ष रुपात यांनी मांडली आहे आणि ही कल्पना फार दूरपर्यंत प्रज्ञा नक्की नेतील". या कार्यक्रमाला विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

या प्रकल्पातून पुढच्या १० वर्षांत १००० महिलांना घर देण्याची शाश्वती दिली आहे. खास म्हणजे वीर सैनिक महिलांना विशेष सबसिडी देण्यात येईल. महिला स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण करून जीवन बदलण्याचा प्रयत्न करतील. म्हणून आम्ही महिलांना सुरक्षित आणि परवडण्याजोगे घरांचा पर्याय उपलब्ध करुन देणार आहोत. स्त्रियांना सशक्त करणे, त्यांच्यासाठी स्वतःचे घर असणे, याद्वारे त्यांची स्वतःची ओळख तयार करण्यामागे उद्देश आहे. अभिनेत्री मृणाल कुलकर्णी म्हणाली, ह्या कार्यक्रमाचा मुहूर्त म्हणजेच स्त्रीला आत्मसन्मान देण्याची वृत्ती व ही वृत्ती वाढीला लागावी.

www.ashwinipublicity.com